3.4.1

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड

## राष्ट्रीय सेवा योजना : हिवाळी शिबीर : चांदगिरी,ता.जि.नाशिक
## 02/01/2023 ते 08/01/2023 - अहवाल

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय नाशिकरोड व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे यांच्या संयुक्तविद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबीर दिनांक 02/01/2023 ते 08/01/2023 या कालावधीत चांदगिरी,ता.जि.नाशिक येथे संपन्न झाले. शिबीराच्या पहिल्या दिवशी सकाळी शिबीरात सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थीनीं सर्व प्रथम कामाची सुरुवात राष्ट्रगीत व प्रार्थनेने झाली. उद्घाटन कार्यक्रमासाठी नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव मा.श्री.प्रसाद कुलकर्णी, चांदगिरीचे माजी सरपंच मा.श्री.रमेश कटाळे, उपसरपंच मा.सौ.प्रियंका कटाळे, मा.श्री.किरण कटाळे व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.समीर लिंबारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. मा.श्री.प्रसाद कुलकर्णी यांनी आपल्या मार्गदर्शनातून राष्ट्रीय सेवा योजनेबद्दल माहिती सांगितली तसेच समाजाचे प्रबोधन केले पाहिजे, स्वतःचा विकास घडवून आणला पाहिजे असे सांगितले. चांदगिरी गावाचे माजी सरपंच मा.श्री.रमेश तुकाराम कटाळे यांनी सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले. सर्व गावाचे ग्रामस्थ सर्व विद्यार्थीनींना मदत लागल्यास सहकार्य करतील असे आश्वासन त्यांनी दिले. मा.श्री.किरण कटाळे यांनी शिबीराला मनापासून शुभेच्छा दिल्या. मा.सभापती मा.श्री.संजय तुंगार सर म्हणाले की, शिबीरामुळे गावात चैतन्य निर्माण होण्यास मदत होते. त्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना खुप चांगली चळवळ आहे. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.समीर लिंबारे यांनी सर्वांना खूप मोलाचे मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले. गावातील नवीन नवीन गोष्टी शिका व एकमेकांमध्ये प्रेम, जिव्हाळा निर्माण करा असे सांगितले.

उद्घाटन प्रसंगी विशेष अतिथी म्हणून कोटमगांवचे सरपंच मा.श्री.बाळासाहेब म्हस्के, उपसरपंच मा.श्री.चंद्रभान म्हस्के, ग्रामविकास अधिकारी मा.पी.टी.सानप मॅडम, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक, चांदगिरीचे सर्व ग्रमस्थ, महाविद्यालयाचे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी व शिबीरातील सर्व विद्यार्थीनी उपस्थित होत्या.उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रास्ताविक परिचय व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार संस्थेच्या कार्यकारी मंडळ सदस्या मा.डॉ.सौ.मिनल बर्वे यांनी मानले.

शिबीराच्या पहिल्या दिवशी उद्घाटन कार्यक्रमानंतर कोटमगांवचे सरपंच मा.श्री.बाळासाहेब म्हस्के यांनी ग्रामविकास आणि तरुणांचा सहभाग या विषयावर पुष्प गुंफले. त्यांनी सर्वांना एक तरुण काय काय करु शकतो ते

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road

Programme Officer
N.S.S Unit

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड

सांगितले. त्यांनी स्वतःच्या गावाचा विकास कसा केला, कोटमगांवला आदर्श पुरस्कार कसा मिळाला असे अनेक उदाहरण देऊन पटवून दिले. त्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन परिचय व आभार कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी केले. 02.30 वाजता चांदगिरी गावातील हनुमान मंदिर येथील परिसर स्वच्छ केला. काही विद्यार्थीनींनी झाडू मारला तर काहींनी गवत काढले. सर्वांनी मिळून वेगवेगळे काम केले.

दिनांक 03/01/2023 रोजी रा.से.यो हिवाळी शिबीर सर्व प्रथम आमच्या कामाची सुरुवात राष्ट्रगीत व प्रार्थनेने झाली. नंतर सर्व विद्यार्थीनींचे ग्रुप तयार करण्यात आले. सर्व ग्रुपला कामे वाटप करण्यात आली. सर्व प्रथम विद्यार्थीनींनी घरोघरी जाऊन महिलांना आरोग्य विषयी, शिक्षणाविषयी, स्वच्छतेविषयी आवाहन केले व माहिती दिली तसेच महिलांशी चर्चा केली. हितगुज साधले व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांना हिवाळी शिबीरातील हेल्थ चेकअपसाठी आवाहन केले. नंतर सर्व विद्यार्थीनींनी एकत्र येऊन परिसर स्वच्छ केला. यावेळी प्रा.डॉ.वाकळे, प्रा.डॉ.कुशारे, प्रा.डॉ.भावसार, प्रा.डॉ.बेलदार, श्री.सुभाष शिंदे हे उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून हायकोर्ट मुंबई येथील ॲड.मा.श्री.प्रेमनाथ पवार व मा.ॲड. श्री.प्रतिक पवार हे उपस्थित होते. त्यांनी सामाजिक कायदे, कर्तव्य व अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले. ॲड. प्रेमनाथ पवार यांनी कायदा म्हणजे काय ते सांगितले. कायदा हा प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक आहे. कायदा हा सामाजिक जीवनातून आलेला आहे. कायद्याचे दोन प्रकार पडतात. एक म्हणजे राज्य व दुसरा केंद्र. कायदा हा सर्वांसाठी समान असतो हे माहिती असणे गरजेचे असते असे त्यांनी सांगितले. ॲड पवार यांनी विद्यार्थीनींना शिक्षणाचा हक्क, पोटगी, हिंसाचार असे विविध कायद्यांबद्दल माहिती दिली. ॲड.श्री.प्रतिक पवार यांनी राज्य घटनेबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. महिलांना मतदानाचा हक्क कसा मिळाला तसेच ट्रिपल तलाख म्हणजे काय हे थोडक्यात समजावून सांगितले तसेच कोणतेही सामाजिक व्यवहार करतांना भान जपले पाहिजे असेही त्यांनी सांगितले. या सत्राचे सुत्रसंचालन कु.वैष्णवी सिकची हिने केले व परिचय कु.आरती जाधव हिने करुन दिला. प्रा.डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी पाहुण्यांचे आभार मानले.

दिनांक 04/01/2023 रोजी हिवाळी शिबीराच्या कामाची सुरुवात राष्ट्रगीत व प्रार्थनेने झाली. नंतर प्रा.डॉ.वाकळे, प्रा.डॉ.भावसार, प्रा.श्री.बोरसे, प्रा.करंजकर यांनी मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थीनींनी चांदगिरी गावातील रस्ते, गल्ल्या झाडून घेतल्या. जमा झालेला कचरा गोळा करुन तो कचरा कुंड्यांमध्ये टाकण्यात आला व प्रत्येकाला स्वच्छतेचे महत्व समजावून सांगितले. नंतर विद्यार्थीनींनी नाटकाची, सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली. यानंतर गावातील महिला सौ.राधिकाताई कटाळे यांनी सांय.04.00 वाजता सर्व विद्यार्थीनींना स्त्रीयांचे आरोग्य व स्वच्छतेविषयी माहिती दिली तसेच महिलांना व मुलींना होणारे आजार ह्यावर उपाय सांगितले. कशाने काय होते हे समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे आभार प्रा.करंजरकर मॅडम यांनी मानले.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422

Programme Officer
N.S.S Unit

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

दिनांक 05/01/2023 रोजी हिवाळी शिबीराची सुरुवात राष्ट्रगीत व प्रार्थनेने झाली. त्यानंतर सर्व विद्यार्थीनींनी एकत्र येऊन गावात प्रबोधन केले व शिवार फेरी काढण्यात आली. या फेरीमध्ये ' बेटी बचाव बेटी पढाओ ', वृक्षसंवर्धन, पर्यावरण संवर्धन, मतदान जाणिव जागृती, आरोग्य जाणिव जागृती, शिक्षण जाणिव जागृती इत्यादी विषयांवर विद्यार्थीनींनी घोषणा दिल्या. ' लेक वाचवा, लेक वाढवा ', ' मतदार दाता जागरुक हो ' ' शिकलेली आई घरदार पुढे नेई ', वृक्षवल्ली आम्हा सोयरे इत्यादी घोषणा देत विद्यार्थीनींनी परिसर धुमधूमून सोडला. त्यामुळे गावातील गावातील वातावरणात चैतन्य निर्माण झाले. प्रबोधन रॅलीमध्ये उपसरपंच सौ.प्रियंकाताई कटाळे, मा.श्री.किरण कटाळे, मा.श्री.काळूमामा कटाळे आदींनी उपस्थित राहून रॅलीचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी रॅलीतील विद्यार्थीनींना व ग्रामस्थांना मुलींचे महत्व, शिक्षणाचे महत्व, मतदार जाणिव जागृती इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. रॅलीद्वारे चांदगिरी गावात मुख्य रस्त्यावरुन गावातील अडीच ते तीन कि.मी इतकी मोठी रॅली काढून जाणिव जागृतीचे काम करण्यात आले. या रॅलीमध्ये जि.प.शाळा चांदगिरी येथील विद्यार्थी व शिक्षक हे सहभागी झाले होते तसेच प्रा.स्मिता माळवे, प्रा.डॉ.जीवन सोळंके, प्रा.डॉ.अविनाश भावसार, श्री.सुरेश काकवीपुरे व चांदगिरी गावातील ग्रामस्थांचे सहकार्य लाभले व चांगला प्रतिसाद मिळाला. शाळेच्या पटांगणात रॅलीचे विसर्जन करण्यात आले.

रॅलीच्या यशस्वी आयोजनानंतर जि.प शाळा या ठिकाणी रा.से.योजनेच्या माध्यमातून चांदगिरी गावासाठी विविध प्रकारची वीस झाडे उपलब्ध करुन देण्यात आली. त्यापैकी काही झाडांचे प्राथमिक शाळेच्या आवारात चांदगिरीचे माजी सरपंच मा.श्री.रमेश अप्पा कटाळे, मा.श्री.किरण कटाळे, कार्यक्रम अधिकारी डॉ.वाकळे, डॉ.भावसार चांदगिरी गावातील ग्रामस्थ,महिला महाविद्यालयाचे प्राध्यापक, रा.से.योजनेच्या विद्यार्थीनी यांच्या उपस्थितीत वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. शाळा परिसरामध्ये विविध प्रकारची झाले लावण्यात आली. या वृक्षारोपणामध्ये शाळेच्या प्रांगणात आनंददायी वातावरण निर्माण झाले होते.

दुपारच्या सत्रात पिंपळनेर महाविद्यालय धुळे येथील हिंदी विभाग प्रमुख व रा.से.योजना अधिकारी मा.डॉ.आनंद खरात यांनी राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक परिवर्तनाची चळवळ या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले 12वी नंतर व्यक्तीचा महत्वाचा विकास होत असतो. महाविद्यालयात असंख्य योजना असतात. एन.एस.एस मध्ये भाग घेणारे विद्यार्थी हे समाजसेवा करतात. तर एन.सी.सी मध्ये भाग घेणारे विद्यार्थी भरतीत उतरतात. रा.से.योजना हे व्यक्तीचे भाव भावनांचे प्रतिक असते. डॉ.खरात म्हणाले की, विद्यार्थ्यांना जे ज्ञान मिळते ते फक्त चार भिंतीच्या आत नसते. हे सांगतांना ते एक उत्तम उदाहरण देऊन पटवून सांगतात. त्यांनी आम्हाला वसंत बापट यांनी कविता गाऊन दाखविली तसेच राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे छोट्या छोट्या गोष्टीतून पुढे जाणे असे सांगितले.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

Programme Officer
N.S.S Unit

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

यानंतर चांदगिरी गावातील ग्रामसेविका पी.टी.सानप मॅडम तसेच चांदगिरी गावातील बचत गटांच्या महिला यांनी आम्हाला ग्रामसेवा व बचत गटाबद्दल माहिती दिली. बचत गट म्हणजे काय व बचत गट कसे चालविलेल जातात हे समजावून सांगितले तसेच बचत गटातून कसा फायदा होतो व बचत गटामार्फत त्या काय काय उत्पादन करतात हेही त्यांनी आम्हाला सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रा.स्मिता माळवे, प्रा.डॉ.जीवन सोळंके, कार्यक्रम अधिकारी डॉ.गोरखनाथ वाकळे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा.स्मिता माळवे यांनी मानले.

दिनांक 06/01/2023 रोजी हिवाळी शिबीराच्या कामाची सुरुवात राष्ट्रगीत व प्रार्थनेने झाली. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजना व श्रीगुरुजी रुग्णालय,नाशिक यांच्या संयुक्तविद्यमाने मोफत वैद्यकीय तपासणी शिबीराचे उद्घाटन मा.श्री.किरण कटाळे, मा.सखाहरी कटाळे तसेच श्रीगुरुजी रुग्णालयाचे प्रसिध्द डॉ.मुंगी, डॉ.भावे यांचे हस्ते झाले. याप्रसंगी चांदगिरीतील ग्रामस्थ, डॉ.वाकळे, डॉ.भावसार, प्रा.प्रतिक्षा पाटील, प्रा.सरोजिनी अहिरे व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनी उपस्थित होत्या. उद्घाटनानंतर ग्रामस्थांच्या आरोग्य तपासणीस सुरुवात झाली.
सकाळी 10 वाजेपासून दुपारी 02.15 पर्यंत चांदगिरीतील महिला, पुरुष, तरुण, तरुणी तसेच ग्रामपंचायत सदस्य श्री.किरण कटाळे, श्री.सखाहरी कटाळे यांची आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, शिक्षक तसेच महिला बचत गटाच्या सदस्या व शिबीरार्थी विद्यार्थीनींची आरोग्य तपासणी करण्यात आली. दुपारी 2.15 पर्यंत सुमारे 80 नागरिकांची आरोग्य तपासणी करुन त्यांना श्रीगुरुजी रुग्णालयातर्फे मोफत औषधे देखील देण्यात आली. दुपारच्या सत्रात विद्यार्थीनींची चांदगिरी येथील प्रसिध्द सप्तश्रृंगी देवी मंदिर या ठिकाणी सहल नेऊन विद्यार्थीनींना मंदिराची व आजूबाजूच्या नैसर्गिक वातावरणाची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमासाठी डॉ.वाकळे, डॉ.भावसार, श्रीमती.अहिरे, श्रीमती.पाटील व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

दिनांक 07/01/2023 रोजी कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत आणि प्रार्थनेने झाली. सकाळ सत्रात मा.श्री.संजय किर्तने, कार्यालयीन अधिक्षक, कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,नाशिकरोड यांचे ' स्वातंत्र्याचे 75 वर्षे ' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. त्यामध्ये त्यांनी स्वातंत्र्यपूर्व भारताची परिस्थिती, ब्रिटीशांची भारतातील पुडनिती, कारस्थान इत्यादी विषयी माहिती दिली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताची शेती, उद्योग, संरक्षण, विदेशी संबंध त्यामध्ये झालेले बदल व भारताची विकसित होत चाललेली अर्थव्यवस्था यासंबंधी सविस्तर माहिती दिली. स्वातंत्र्यासाठी प्रत्येक नागरिकाने व तरुणाने आपला खारीचा वाटा उचलून स्वातंत्र्याच्या प्रगतीला हातभार लावावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अविनाश भावसार यांनी केले. डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला प्रा.प्रकाश वारकरी, प्रा.मानसी नंदागवळी, श्री.सुभाष शिंदे व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

Programme Officer
N.S.S Unit

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

पुढच्या सत्रात ' योग शिक्षण आणि तरुण ' या विषयावर प्रा.योगेंद्र पाटील यांनी मार्गदर्शन केले. शारिरीक तंदुरुस्तीसाठी घ्यावयाची काळजी, दैनंदिन आहार, व्यायाम, आरोग्यासाठी आवश्यक झोप, अन्न, पाणी इत्यादी किती प्रमाणात घ्यावे तसेच आरोग्या संदर्भात किती सावधगिरी बाळगावी या संबंधी मार्गदर्शन करुन विद्यार्थीनींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. या कार्यक्रमाचे स्वागत, परिचय डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी केले तर आभार डॉ.अविनाश भावसार यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा.प्रकाश वारकरी, प्रा.मानसी नंदागवळी, श्री.सुभाष शिंदे व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दुपारी 04.00 ते 06.00 या कालावधीत विद्यार्थीनींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

या कार्यक्रमामध्ये राष्ट्रभक्तीपर गीत, राष्ट्रीय सेवा योजना गीत, महाराष्ट्रीय मराठमोळी गाणी, लावणी, सामुहिक नृत्य, वैयक्तिक नृत्य, समान प्रबोधनपर एकांकिका व सामाजिक संदेश देणारे कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक 08 जानेवारी 2023 रोजी सकाळी समारोप कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महिला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा.डॉ.अश्विनीकुमार भारद्वाज हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.समीर लिंबारे, चांदगिरी गावाचे सरपंच श्री.रमेश अप्पा कटाळे, उपसरपंच, पोलिस पाटील, प्रतिष्ठित नागरिक हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.अविनाश भावसार यांनी केले तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय कार्यक्रम अधिकारी डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी केला. उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यानंतर कु.आरती जाधव हिने अहवाल वाचन केले. काही विद्यार्थीनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.अश्विनीकुमार भारद्वाज यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले व चांदगिरी गावाला अशोकाची 50 झाडे व इतर 110 झाडे देणगीच्या स्वरुपात दिली तसेच महिला महाविद्यालयाच्यावतीने 30 झाडे देण्यात आली. चांदगिरी गावाचे सरपंच , उपसरपंच यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर महिला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.समीर लिंबारे यांनी अध्यक्षीय भाषण केले.

यानंतर सर्वोत्कृष्ठ स्वयंसेविका म्हणून कु.क्षितिजा तेलोरे हिची निवड करण्यात आली तसेच एन.एस.एस च्या पाचही गटांचे लिडर यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.अविनाश भावसार यांनी मानले.

डॉ.गोरखनाथ वाकळे
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना
Programme Officer
N.S.S Unit

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

प्रा.डॉ.समीर लिंबारे
प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,नाशिकरोड

### राष्ट्रीय सेवा योजना : एड्स रॅली : जाणिव जागृती सप्ताह

राष्ट्रीय सेवा योजना व बिटको महाविद्यालय,नाशिकरोड महानगरपालिका,नाशिक यांच्या संयुक्तविद्यमाने दिनांक ०३ डिसेंबर, २०२२ रोजी जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५० विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये नाशिकरोड परिसरातील अनेक नामवंत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, स्वयंसेवक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जागतिक एड्स दिनानिमित्ताने EQUILZE या घोषवाक्याने रॅलीमध्ये आपली एकता, समानता, HIV सह जगणाऱ्यांकरीता लोकांचे प्रबोधन करण्यात आले. अनेक विद्यार्थी, प्राध्यापक नाशिकरोड येथील हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालय,नाशिकरोड, सत्कार चौक, सुभाष रोड, नाशिकरोड एस.टी स्टँण्ड अशा मार्गाने रॅलीचे आयोजन करुन रॅलीमध्ये विविध प्रकारच्या घोषणा देण्यात आल्या. अनेक घोषवाक्ये विद्यार्थीनींनी सोबत आणली होती. रॅलीला रेड रिबनचे समन्वयक मा.श्री.चव्हाण सर यांनी मार्गदर्शन केले. महिला महाविद्यालयाच्यावतीने डॉ.अविनाश भावसार, प्रा.प्रतिक्षा पाटील व विद्यार्थीनी उपस्थित होत्या. रॅलीच्या यशस्वी आयोजनानंतर बाळासाहेब ठाकरे रुग्णालय,नाशिकरोड येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

डॉ.गोरखनाथ वाकळे
एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
N.S.S. Unit

प्रा.डॉ.समीर लिंबारे
प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै.बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,नाशिकरोड

## राष्ट्रीय सेवा योजना : राष्ट्रीय मतदान जागृती दिन अहवाल : २५/०१/२०२३

दिनांक २५/०१/२०२३ रोजी कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, नाशिकरोड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत राष्ट्रीय मतदान जागृती दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्रांगणातून मोठ्या विद्यार्थीनी संख्येने सकाळी १०.०० वाजता रॅलीला सुरुवात करण्यात आली. रॅलीचा मार्ग सानेगुरुजी नगर, शिखरेवाडी,गंधर्व नगरी, शिवाजी पुतळा, जिजामाता नगर अशा दोन ते तीन किमी. अंतराने रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये विद्यार्थीनींनी अनेक घोषवाक्ये तयार करुन आणलेली होती तसेच विद्यार्थीनी मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो, आपला आवाज लोकशाहीचा, आपले मत आपला आवाज, आपले मत मताचे दान आहे लोकशाहीचे दान, छोडो आपले सारे काम, पहले चलो करे मतदान, जन-जन की यही पुकार वोट डालो अबकी बार इत्यादी घोषणा देऊन परिसर दुमदुमून सोडला. वरील सर्व ठिकाणी विद्यार्थीनींनी गोलाकार रिंगण करुन विविध घोषणांनी महाविद्यालयाच्या प्रांगणात रॅली आल्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.समीर लिंबारे यांनी रॅलीचे स्वागत केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्व सांगून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे, ते आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे, यासाठी प्रत्येक नागरिकाने जागरुक राहून मतदान करावे असे सांगितले. प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.समीर लिंबारे यांनी राष्ट्रीय मतदान दिवसाचे महत्व सांगून प्रत्येकाने आपला हक्क मतदानातून बजावावा तरच आपण चांगले प्रतिनिधी निवडून देऊ शकतो असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होत्या तसेच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.अविनाश भावसार, श्री.सुभाष शिंदे, बी.ए.पी कॉम्प्युटर ॲकॅडमीचे संचालक श्री.सुभाष पाटील हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी मानले.

डॉ.जी.ई.वाकळे
एन.एस.एस.कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
N.S.S. Unit

प्रभारी प्राचार्य
प्रा.डॉ.समीर लिंबारे
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड
INCHARGE PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422 101

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,नाशिकरोड

## राष्ट्रीय सेवा योजना : वृक्षारोपण कार्यक्रम अहवाल

राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२२ रोजी मौजे चांदगिरी या ठिकाणी वृक्षारोपण व स्वच्छता अभियान कार्यक्रम राबविण्यात आला. चांदगिरी गावातील माजी सरपंच मा.श्री.रमेश कटाळे, उपसरपंच सौ.प्रियंका किरण कटाळे, मा.श्री.किरण कटाळे, मा.श्री.रामहरी तुकाराम कटाळे, ग्रामसेविका मा.सौ.सानप मॅडम व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चांदगिरी गावातील प्राथमिक शाळेच्या परिसरात व स्मशानभूमीत विविध प्रकारची ३० ते ४० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये गुलमोहर, चिंच, हिरडा,बेहडा, कदंब अशा विविध वृक्षाचे रोपण चांदगिरीचे सरपंच, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.गोरखनाथ वाकळे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.अविनाश भावसार,राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनी व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत करण्यात आले. तसेच एन.एस.एस च्यावतीने चांदगिरी गावात २०० वृक्ष लावण्याचा संकल्प करण्यात आला. महिला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा.डॉ.अश्विनीकुमार भारद्वाज यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अशोकाची ५० झाडे, रक्कम रुपये ५०,०००/- इतक्या किंमतींची झाडे तात्काळ उपलब्ध करुन दिली. या वृक्ष लागवडीमुळे गावाच्या सौंदर्यात भर पडण्यास व पर्यावरण संतुलन साधण्यास मदत होणार आहे. प्रा.डॉ.अविनाश भावसार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

डॉ.गोरखनाथ वाकळे
एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
N.S.S. Unit

प्रा.डॉ.समीर लिंबारे
प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, नाशिकरोड

## राष्ट्रीय सेवा योजना : स्वच्छता अभियान व जन जागृती

राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने दिनांक १० ऑक्टोबर २०२२ रोजी चांदगिरी या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी चांदगिरी गावातील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, गल्ली, प्राथमिक शाळा परिसर, हनुमान मंदिर परिसर, ग्रामपंचात चांदगिरी परिसर इत्यादी ठिकाणी रस्ते स्वच्छता, रस्त्यांवर पडलेला कचरा उचलून तो कचरा कुंड्यांमध्ये टाकूण त्याची विल्हेवाट लावण्यात आली. स्वच्छता अभियान कार्यक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनींनी प्रत्येक घरामध्ये जावून महिला नागरिक शाळेतील विद्यार्थी, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य इत्यादीनींना स्वच्छतेचे महत्व पटवून सांगितले. अस्वच्छतेमुळे निर्माण होणारी रोगरायी दुरकरण्यासाठी गाव स्वच्छ असणे किती महत्वाचे आहे हा संदेश राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थीनींनी ग्रामस्थांना दिला. या कार्यक्रमामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या बहुसंख्य विद्यार्थीनी चांदगिरी माजी सरपंच मा. श्री. रमेश कटाळे, सखाहरी कटाळे, किरण कटाळे, प्रियंका कटाळे, मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. एन.एस.एस च्यावतीने नागरिकांना स्वच्छता ठेवण्यासंदर्भात आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास एन.एस.एस अधिकारी डॉ. गोरखनाथ वाकळे व सहाय्यक अधिकारी डॉ. अविनाश भावसार हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार कु. क्षितीजा तेलोरे हिने मानले.

डॉ. गोरखनाथ वाकळे
एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी
Programme Officer
N.S.S Unit

प्रा. डॉ. समीर लिंबारे
प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र. मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र. मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, नाशिकरोड

## राष्ट्रीय सेवा योजना : महात्मा गांधींचे विचार आणि आधुनिक भारत व्याख्यान अहवाल

## ०२/१०/२०२२

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय नाशिकरोड राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत महात्मा गांधींचे विचार आणि आधुनिक भारत या विषयावर दिनांक ०२/१०/२०२२ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.आरती जाधव हिने केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वतीपूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी केले. यानंतर प्रमुख अतिथी मा.श्री.श्रीकांत नावरेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये त्यांनी महात्मा गांधींचे विचार आणि आधुनिक भारत यावर आपले मत मांडले. त्यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनाचा प्रवास कसा झाला व भारताला स्वातंत्र्य कसे मिळवून दिले हे थोडक्यात सांगितले. त्यांनी गांधीजींचे पर्यावरणाबद्दल काय मत होते हे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.समीर लिंबारे यांनी गांधीजींच्या विचाराचा वारसा घेऊन देशाला वाटचाल करावी लागेल, गांधीजींनी अनेक विषय अहिंसेच्या मार्गाने सोडवून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले असे सांगितले.

कार्यक्रमाचे आभार डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी मानले. या कार्यक्रमास १०० विद्यार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

प्रा.डॉ.गोरखनाथ वाकळे
रा.से.यो कार्यक्रम अधिकारी

डॉ. समीर लिंबारे
प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे,

**कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,नाशिकरोड**

**राष्ट्रीय सेवा योजना :**

**नैसर्गिक गुळ शेती प्रकल्प, मु.पो.शिंदे,पळसे क्षेत्रीय भेट अहवाल**

राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने दिनांक ०२/०३/२०२३ रोजी मु.पो.शिंदे,पळसे येथील नाशिक हनीबी फार्मर प्रोड्युसर कं.लि. गोडवा गुळ प्रकल्प या ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनी भेट दिली. कंपनीचे व्यवस्थापक मा.श्री.विष्णूपंत गायधनी व मा.श्री.संजय तुंगार यांनी सुरुवातीला महाविद्यालयाचे व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थीनींचे भेट आयोजित केल्याबद्दल स्वागत केले तसेच प्रकल्पासंबंधी सर्व बाबींची सविस्तर माहिती दिली. या प्रकल्पासाठी शिंदे - पळसे येथील आजूबाजूस असणाऱ्या शेतकऱ्यांना या प्रकल्पामध्ये सहभागी केलेल आहे. त्यामध्ये ७५ शेतकरी सहभागी झालेले असून सहकारी तत्वावर हा प्रकल्प काम करतो. सभासद शेतकऱ्यांकडून विशिष्ट प्रजातीचा उस मागवून त्यावर नैसर्गिक प्रक्रिया करुन उसाचा रस ११० ते १२० डि.से तापमानावर उकळून त्यापासून पाक तयार केला जातो आणि त्यानंतर त्यावर प्रक्रिया करुन पाच ते दहा ग्रॅम वजनाचे गुळ तसेच एक किलो वजनाचा गुळ, गुळपावडर आणि गुळाची काकवी तयार केली जाते. तयार झालेला माल नाशिक जिल्ह्यासह साधारणपणे पाच जिल्ह्यांमध्ये पुरविला जातो. ऑर्डर प्रमाणे गुळाचे उत्पादन केले जाते. साधारणतः वर्षभरात ७५० मे.टन इतके गुळाचे उत्पादन घेतले जाते. नाशिक मधील मेट्रोमॉल यांना देखील गुळाचा पुरवठा केला जातो. नैसर्गिक पध्दतीने गुळाचे उत्पादन होत असल्याने मानवी शरिरासाठी आरोग्यदायक असा गुळ असल्याने गुळाची मागणी दिवसेंदिवस वाढतांना दिसत आहे. त्यासाठी सर्व संचालक, आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर आधिकाधिक मार्केटींग यावर लक्ष देऊन गुळाचे उत्पादन वाढवित आहे. इत्यादी प्रकारची सर्व सविस्तर माहिती विद्यार्थीनींना देण्यात आली.

भेटीनंतर विद्यार्थीनींनी वनभोजन केले तसेच दारणेश्वर नदीवर नैसर्गिक रित्या अस्तीत्वात आलेल्या दारणेश्वर मंदिराला भेट देऊन तेथील नैसर्गिक परिस्थितीची पाहणी केली.या कार्यक्रमास एन.एस.एस अधिकारी डॉ.गोरखनाथ वाकळे व सहाय्यक अधिकारी डॉ.अविनाश भावसार, प्रा.प्रतिक्षा पाटील व ४० विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

डॉ.गोरखनाथ वाकळे
एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी

INCHARGE PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422 101

प्रा.डॉ. समीर लिंबारे
प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे,

## कै.बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय,नाशिकरोड

## राष्ट्रीय सेवा योजना दिवस कार्यक्रम अहवाल : २४/०९/२०२२

दिनांक २४/०९/२०२२ रोजी महाविद्यालयात **राष्ट्रीय सेवा योजना दिवस** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी समाजसेविका मा.सौ.चैत्राताई हांडीगोल या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या तर महाविद्यालयाचे प्राचार्य हे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख वक्त्यांचे स्वागत व परिचय कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी केले. मा.सौ.चैत्राताई हांडीगोल यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करतांना राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य Not Me But You असे आहे कारण राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक हे समाजासाठी नेहमी पुढाकाराने काम करीत असतात. आपल्या दैनंदिन आचारणात समाजाप्रती कोणतेही काम करतांना काम छोटे अथवा मोठे याचा विचार न करता आपण सातत्याने काम करीत रहावे. यामध्ये समाजसेवा, आरोग्य, शिक्षण, महिलांच्या समस्या इत्यादी क्षेत्रात स्वयंसेवकांनी काम करावे. त्यासाठी त्यांनी उत्तर प्रदेशातील एका अशिक्षित व्यक्तीने ३५० एकरावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करुन शासनाची कोणत्याही प्रकारची मदत न घेता एक सामाजिक सेवेचे चांगले उदाहरण समाजाप्रती घालून दिले असे सांगितले.

मा.अध्यक्षांनी विद्यार्थीनींना आपण ज्या क्षेत्रात कार्य करतो त्या क्षेत्रात अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचून कार्य करावे आणि समाजाप्रती आपल्या संवेदना जागृत ठेवाव्यात. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या बहुसंख्य विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे आभार कार्यक्रम अधिकारी डॉ.गोरखनाथ वाकळे यांनी मानले.

डॉ.गोरखनाथ वाकळे
एन.एस.एस कार्यक्रम अधिकारी

प्रा.डॉ.समीर लिंबारे
प्रभारी प्राचार्य
ना.शि.प्र.मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख
कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
साने गुरुजी नगर, जेलरोड, नाशिकरोड.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

INCHARGE PRINCIPAL
N S P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road. Nasik Road-422 101